यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र
मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक – ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत
ज्ञानगंगा घरोघरी

Yashwantrao Chavan Maharashtra
Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India

संकेतस्थळ Website : •www.ycmou.ac.in •https://ycmou.digitaluniversity.ac
ई–मेल E-mail : dir_shu@ycmou.digitaluniversity.ac दूरध्वनी Telephone : (0253) 2231475

मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा / School of Humanities & Social Sciences

दिनांक : २० /११ /२०२५

# उद्बोधन वर्ग अहवाल

## शैक्षणिक वर्ष २०२५-२६,

## एम. ए पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम (लोकप्रशासन M58)

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (DEB) मार्गदर्शक सूचनेनुसार पदव्युत्तर पदवी एम. ए. लोकप्रशासन (M58) या शिक्षणक्रमाला प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी उद्बोधन वर्ग दि. ११ऑक्टोबर २०२५ रोजी दोन सत्रात मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेमध्ये ऑनलाईन माध्यमातून आयोजित केला होता. यावेळी डॉ. सुनील गावंडे शैक्षणिक संयोजक लोकप्रशासन, यांनी प्रास्ताविक व उद्बोधन वर्ग आयोजित करण्याची भूमिका विशद केली. या उद्बोधन वर्गासाठी मार्गदर्शक म्हणून विद्याशाखेचे संचालक प्रा. नागार्जुन वाडेकर उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना दूरस्थ शिक्षणप्रणाली, विद्यापीठाची पार्श्वभूमी, विद्यापीठचा परिचय, उदिष्टे, विद्यापीठ कार्यपद्धती याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

या उद्बोधन सत्रात डॉ. गावंडे, यांनी PPT च्या माध्यमातून सकाळी ११:३० ते १:०० या मध्ये प्रथम सत्रातील विद्यार्थांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार शिक्षणक्रमातील विविध अभ्यासक्रमांची ओळख करून दिले. तसेच त्यामध्ये त्यांनी मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेचा परिचय, उद्दिष्टे, शिक्षणक्रमाची उद्दिष्टे, निष्पती, शिक्षणक्रम संरचना, अभ्यासक्रम संरचना, श्रेयांक पद्धती, मूल्यमापन संरचना, मुल्यांकन पद्धत , स्वयं-अध्ययन साहित्य, समंत्रण सत्रे, गृहपाठ पद्धती, विद्यार्थी कल्याणाच्या विविध योजना, महत्वाची संकेतस्थळे व नोकरीच्या भविष्यातील संधी इत्यादीविषयी मार्गदर्शन करण्यात आहे. तसेच दुसरे सत्र दुपारी २.३० ते ४.०० या वेळेत झाले त्यामध्ये एम. ए. लोकप्रशासनाच्या तृतीय सत्रातील विद्यार्थांना संशोधन पद्धती, क्षेत्रीय प्रकल्प तसेच संधोधन प्रकल्प या विषयी सविस्तर सादरीकरण करण्यात आले.

शेवटी प्रश्नोउत्तराचे सत्र आयोजित करून विद्यार्थ्यांनी शिक्षणक्रमाविषयी तसेच अभ्यासक्रमाबाबत विविध प्रश्न विचारले. त्या सर्व प्रश्नांचे विस्तृत निरासरण करण्यात आले. काही विद्यार्थ्यांनी लोकप्रशासन व आंतरविद्याशाखीय क्षेत्राबाबत तसेच भविष्यकालीन करिअरविषयक मार्गदर्शन मिळण्यासाठी अतिरिक्त सत्र / वर्ग घेण्याची मागणी केली. त्या बाबत विद्यार्थ्यांना आश्वस्त करण्यात आले.

या उद्बोधन सत्रात प्रवेशित विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. शेवटी उपस्थित विद्यार्थ्यांचे आभार मानून मा. संचालक यांच्या संमतीने उद्बोधन वर्गाचा समारोप करण्यात आला. हा उद्बोधन वर्ग यशस्वी होण्यासाठी तांत्रिक सहाय्य श्री. गुलाब घाटाळ, प्रशासकीय सहाय्यक यांनी मोलाचे सहकार्य केले.


**सोबत** : ऑनलाईन झूम लिंक,युट्युबलिंक व फोटो -

Zoom Link - https://shorturl.at/NIPjN

YouTube Live URL: https://youtube.com/live/ra9ZtfB16DU?feature=share

मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
ज्ञानगंगा घरोघरी
य.च.म.मु.वि., नाशिक




मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा * य.च.म.मु.वि., नाशिक * ज्ञानगंगा घरोघरी

संचालक

मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा